# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/12/2022 (रविवार) सकाळ

### चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा अडम शिवार माजंरी रोड येथे दिनांक ०७/१२/२०२२ चे ११.३० वा. ते दिनांक ०८/१२/२०२२ चे ०३.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे– कृष्णा शंकरराव भजभुजे, वय ५७ वर्ष, रा. कुही नमुद घटनावेळी मौजा अडम शिवार माजंरी रोडवर लावलेले बि. एस. एन. एल कंपनीचा मोबाईल टॉवरला लागणारे ०३ टीआई प्रति टीआई किंमती अंदाजे ३,०००/– रू. प्रमाणे एकुण ९,०००/– रू. व ३ कंबाईनर प्रति कंबाईनर ३,०००/– रू. प्रमाणे एकुण ९,०००/– असा एकुण १८,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने टॉवरचे वायर तोडुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ३६४ सुधीर ज्ञानबोनवार पोलीस स्टेशन कुही मो. नं. ८६९८४०७११४ हे करीत आहे.

### दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मौजा ईसापुर खुर्द येथे दिनांक १०/१२/२०२२ चे १६.४५ वा. सुमारास यातील आरोपी नामे– मिलींद धनराज तागडे, रा. इसापुर खुर्द हा फिर्यादी नामे– सौ. प्रिती कैलासजी तागडे, वय ३२ वर्ष, रा. ईसापुर खुर्द याने बटाईने केलेल्या शेतात आला व त्यांना ‘‘तुम्ही हया शेतात कसे काय कापुस वेचता हे शेत माझे आहे’’ असे म्हणुन त्यांना शिवीगाळ करून कुऱ्हाडी ने फिर्यादीची सासु नामे– गोदावरी तागडे हिचे मांडीवर मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३५२, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूढे, ब. नं. १६४६ मो.क्र. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर